
# माहे जून २०२१ मासिक अहवाल

## खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.

| अ. क्र . | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद शहर | रॉकी - बेल्जिअम शेफर्ड | १. पोउपनि श्री. बनसोडे<br>२. पोना/११८८ पी. जी. दळवी<br>३. पोना/११९६ पी. जी. सोनुने | सिटी चौक पो.स्टे. गु.र.नं.१७०/२०२१, भादवि कलम ३०२ हा गुन्हा दि.०८.०४.२०२१ रोजी २२:३० ते दि.०९.०४.२०२१ रोजी ०७:४५ वा. चे दरम्यान घडला असून सदर गुन्हयात श्वानन पथकास बोलविल्यावरुन चित्ताखाना कब्रस्तान येथे तपास कार्य सुरु केले. श्वान रॉकीस मयत अनोळखी इसमाच्या स्लिपर चप्पलचा गंध दिला असता श्वान रॉकी हा घटनास्थळावरुन निघून घटनास्थळाचे उत्तरेकडील दिशेने सुमारे १०० ते २०० फुट अंतरावरील म.न.पा. कार्यालयाच्या पुर्व बाजूस लोखंडी गेटजवळ पाण्याच्या हौदाजवळ एका संशयित बॅगजवळ येऊन बॅगचा गंध सुंघु लागला. सदर बॅग श्वान पथकातील अंमलदार यांनी वरिष्ठ अधिकारी यांचेसमोर उघडून बघितली असता सदर बॅग मध्ये रिझर्व बँक ऑफ इंडिया परिक्षेचे हॉल तिकिट त्याच्यावर विकास देविचंद चव्हाण नाव त्यावर असलेल्या फोटोसह मिळाले. सदरचे कागदपत्र वरिष्ठांनी तपासले असता त्या हॉल तिकीटावरील फोटो व मयत अनोळखी इसम एकच असल्याची खात्री पटली. अशा प्रकारे श्वान रॉकी याने अनोळखी मयत इसमाची ओळख पटविल्याने तपासाची दिशा मिळाली व त्यावरुन गुन्हा उघडकीस येण्यास मदत मिळाली आहे. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| २ | धुळे | विरु | १. सपोउनि/ आर. जे. जाधव<br>२. पोहवा./ ८५९ के. एस. परदेशी | धुळे पो.स्टे. गु.र.नं.१३८/२१, भा.दं.वि. कलम ३०२,३२३ हा गुन्हा दि.२२/०६/२०२१ रोजी ०५.४५ वा. ते ०६.१० वा. चे दरम्यान राजहंस कॉलनी चितोड रोड, धुळे (मयताच्या घराच्या टेरेसवर) घडला. सदर घटनास्थळाची पाहणी करण्यासाठी बोलविलेवरुन श्वान पथकास बोलविले. घटनास्थळाची पाहणी केली असता सदर गुन्हयात हाताळलेले लोखंडी पाईप, फावडे व काळया रंगाची चप्पल आढहून आले. पोनि श्री. देशमुख यांनी सांगितले की सदर गुन्हयातील संशयित मिळून आला असून सदर वस्तुंच्या वासावरुन संशयित इसमाची श्वानाद्वारे ओळखपरेड घेण्यास सांगितलेवरुन घटनास्थळी पो. नि. श्री. देशमुख व पोलीस स्टाफ आणि २ पंचा समक्ष पंच क्र.१)शांताराम अहिरे, पंच क्र.२)गुलाब गौस ऊर्फ बाबू सैय्यद सादिक अन्सारी आणि इतर ९ लोकांना अर्ध गोलाकार पध्दतीने उभे केले. त्यामध्ये क्र.१)पोना/४१६ संदीप पाटील, क्र.२) असई /नानाभाऊ आखाडे, क्र.३)पोह/४७२ भिकाजी पाटील, क्र.४)शांताराम अहिरे, क्र.५)अजिंक्य मेमाणे, क्र.१) पोकॉ/२८७ कमलेश सुर्यवंशी, क्र. ७)गुलाब गौस ऊर्फ बाबू सैय्यद सादिक अन्सारी श्वान हस्तक सपोउनि /आर. जे. जाधव यांनी सदर वस्तुंमधील चप्पलचा वास श्वान विरु यास देऊन सोडले असता श्वान विरु क्र.१ पासून प्रत्येक इसमाचा वास घेत घेत क्र.५ वर उभ्या असलेल्या इसमाच्या अंगावर झेप घेऊन दोन्ही पाय अंगावर ठेवून भुंकू लागला. परत मागील बाजून प्रत्येक इसमाचा वास घेत घेत क्र.५ वर उभ्या असलेल्या इसमाच्या अंगावर झेप घेऊन दोन्ही पाय अंगावर ठेवून श्वान विरु भुंकू लागला. करीता सदर इसमास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव अजिंक्य शिवदास मेमाणे असे असल्याचे सांगितले व त्यास विचारले असता घटनास्थळी मिळून आलेली प्लॅस्टिकची काळया रंगाची मेजर कंपनीची चप्पल नं.८ तुझीच आहे का, तर त्याने ही चप्पल माझीच आहे व लोखंडी पाईप, फावडे मीच हाताळलेले असल्याचे सांगितले करीता पोनि श्री. देशमुख यांच्या समक्ष वस्तुंच्या वासावरुन श्वानाने संशयित इसम नामे अजिंक्य शिवदास मेमाणे यास ओळखून दाखविले. सदरचा गुन्हा श्वानाचे मार्गदर्शनावरून उघडकीस आला. |



| अ. क्र . | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ३ | उस्मानाबाद | रॅम्बो – डॉबरमॅन | १. पोहवा/११५६ ए. एस. गणेश | कळंब पो. स्टे. गु.र.नं.२१४/२१, भा. दं. वि. कलम ३९२ हा गुन्हा दि.२०/०६/२०२१ रोजी १२.३० वा. सुमारास फिर्यादीचे घरी रा.हावरगांव ता.कळंब, जि.उस्मानाबाद येथे घडला. सदर गुन्हयाचे तपासकामी श्वानाची मागणी केल्यावरुन घटनास्थळाची बारकाईने आम्ही श्वानासह पाहणी केली असता घटनास्थळी आरोपीने हाताळलेला हातात मावेल एवढा दगड दिसून आला. पोनि श्री. दगडे साहेबांनी सांगितलेवरुन सदर दगड स्वच्छ पांढरे कागदावर ठेऊन त्याचा श्वानास वास दिला असता श्वान रॅम्बो घटनास्थळ ते हावरगाव रोड ते वाकडी जाणारे कच्चा बैलगाडी रस्त्याने पळत अंदाजे ३ कि.मी. वाकडी कडे जाणारे रोडने वाकडी पारधी वस्तीवर एका घरात गेला. आम्ही पुन्हा रोडवर श्वान रॅम्बो यास घेऊन दगडाचा वास दिला असता श्वानाने परत त्याच पत्र्याचे शेड वजा घर येथे जात असल्याने आम्ही सदर घर कोणाचे आहे असे विचारले असता तेथील महिला नामे ताराबाई राजेंद्र पवार यांनी सदरचे घर आमचे असून मी, मुलगा रमेश राजेंद्र पवार व सुन ओ एकत्र राहत असून मुलगा शिरढोण येथे सकाळी शेतात गेला आहे असे सांगितले. त.अं. व अधिकारी यांनी तपासाचे सुत्र फिरवून सदर इसमास शिरढोण हद्दीत पकडून त्याचेकडे विचारपुस केली असता त्याने सदरील गुन्हा केल्याचे कबूल केले व त्याचेजवळ गुन्हयातील रोख रक्कम रु.१२,०००/- व खत खरेदी केलेली रु.७०००/- ची पावती मिळून आली. आरोपी नामे रमेश राजेंद्र पवार, वय-४२ वर्षे रा.-वाकडी यास अटक करुन पुढील तपास चालू. सदरचा गुन्हा श्वानाचे मार्गदर्शनावरून उघडकीस आला. |



| अ. क्र . | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ४ | सातारा | रिओ | १. पोहवा/ ११ जी. डी. मोरे<br>२. पोहवा/ ७२४ एस. व्ही. सोनवणे | कराड पो.स्टे. गु.र.नं.३४४/२०२१, भा.दं.वि. कलम ४५४, ४५७,३८०,४११,३४ अन्वये गुन्हा नोंद आहे. सदर गुन्हयाचे घटनास्थळावर आरोपीची चप्पल मिळून आली होती. नमूद आर्टीकल हे आरोपीत यांचे असल्याने त्याचा श्वानास वास देऊन आरोपीत याचा शोध घेणे व त्यांचा जाणे येण्याचा मार्ग निश्चित करणे आवश्यक होते. त्यानुसार श्वान रिओ यास त्याचा वास देऊन श्वान रिओ याने आरोपी यांचा येण्या जाण्याचा मार्ग निश्चित करुन दिलेला होता. नमूद मार्गावरील सीसीटिव्ही फुटेज पाहणी करुन आरोपीत यांची ओळख पटवता आली व त्यानुसार सदरचा गुन्हा उघड करुन मुद्देमाल जप्त करणेत आलेला आहे. सदरचा गुन्हा श्वानाचे मार्गदर्शनावरून उघडकीस आला. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ५ | सिंधुदुर्ग | रॅम्बो – डॉबरमॅन | १. पोना/४४५ ए. जी. वेंगुर्लेकर<br>२. पोना/१०५४ एस. एस. देवळेकर | बांदा पो.स्टे. गु.र.नं.०५९/२१, भा.दं.वि. कलम ३०२ दि. ०५.६.२०२१ ते दि.०५.६.२०२१ रोजी ०१:०० वा. घडला असून दि.०५.६.२०२१ रोजी ०९:०० वा. अन्वये या गुन्हयाची दाखल नोंद आहे. सदर गुन्हयाचे घटनास्थळावर दि.०५.६.२०२१ रोजी हजर होऊन उपविभागीय अधिकारी सावंतवाडी यांना रिपोर्ट करुन बांदा पो.स्टे. अधिकारी व कर्मचारी यांचेसह घटनास्थळाची पाहणी केली असता संशयिताने हाताळलेल्या कैचीचा वास श्वान रॅम्बोला दिला असता श्वान रॅम्बो हा मयत झालेल्या रुममध्ये फिरुन मुख्य दरवाजाने बाहेर पडून अंगणामध्ये आला. पुढील पायवाटेन जात डांबरी रस्त्यावर आला व पुढे शेटकरवाडी याठिकाणी थांबला. श्वानास परत वास दिला असता श्वान वाफोली ते बांदा जाणा-या रोडने सुमारे ०१ कि.मी. अंतर जात बांदा ते गोव्याच्या दिशेने जाणा-या राष्ट्रीय महामार्गावर येत घुटमळून थांबला. सदर गुन्हयात श्वानाने दाखविलेला मार्ग आणि बांदा पो.स्टे. यांनी केलेल्या तपासात संशयित आरोपी सुखदेव सोपान बारीक, रा.-बेलेनी, ता. बारासात, पश्चिम बंगाल हा निष्पन्न झालेला असून त्याला बांदा पो.स्टे. यांनी मुंबई येथून अटक केलेली आहे. सदर गुन्हयात संशयिताने वापरलेले हत्यार (टिकाव) बांदा पोलीसांनी गोवा राज्याच्या नदीपात्रातून ताब्यात घेतलेले आहे. संशयित आरोपीने हत्या करुन श्वानाने दाखविलेल्या मार्गाने पुढे गोवा येथे वाहनाने जात रेल्वेने मुंबई (उल्हासनगर) येथे गेल्याची कबुली दिलेली आहे. सदरचा गुन्हा श्वानाचे मार्गदर्शनावरून उघडकीस आला. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ६ | नांदेड | जुन जर्मन शेफर्ड | १. पोहवा/२४६ के. बी. जोंधळे<br>२. पो.शि./१८९४ एम. एन. कसबेवाड | भेंडेवाडी पो.स्टे. कंधार गु.र.नं. १५२/२०२१ भा.द.वि. कलम ४५७, ३८०, हा गुन्हा दि. २९/०५/२०२१ रोजी ते ३०/०५/२०२१ रोजी ०७:०० वाजता च्या सुमारास घडला असून सदर गुन्हयातील घटनास्थळावर छोटा लोखंडी पाईप (अंदाजे २ फुट) मिळून आला. पोलीस स्टेशन स्टाफ ने ताब्यात घेतलेल्या ०१ संशयीत इसमासोबत गावातील ५० ते ६० अंदाजीत व्यक्ती मंदीराच्या ओटयावर मंदीराच्या परिसरात बसले होते. श्वान जुन हिस लोखंडी पाईपचा वास देऊन सोडले असता श्वान जुन वास घेत घेत ०७ ते ०८ व्यक्तीजवळ जाऊन वास घेत घेत संशयीत व्यक्तींच्या आंगावर जावुन भुंकून इशारा दिला. परत श्वान जुन हिस सदर पाईपचा वास देऊन सोडले असता श्वानाने वरिलप्रमाणेच मार्गदर्शन केले आहे. सदर व्यक्तीकडे तपास केला असता गुन्हा उघडकीस आला. |



**अशा प्रकारे माहे जून २०२१ मध्ये खुन - ०३ , घरफोडी – ०२, जबरी चोरी - ०१,**
**असे एकुण ०६ गुन्हे , श्वान पथकामार्फत उघडकीस आलेले आहेत.**